# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः05.01.2026** **वारःसोमवार**

---

1. राष्ट्र उभारणीत खेळाची भूमिका महत्वाची असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन
2. चीनला मागे टाकून भारत जगातील तांदळाचा सर्वात मोठा उत्पादक देश बनला-कृषि मंत्री शिवराजसिंग चौहान
3. ओमान आणि न्यूझीलंडमध्ये आयुष औषध प्रणालीच्या उत्पादनांना मान्यता
4. स्वदेशी बनावटीच्या समुद्र प्रताप या युद्धनौकेचं आज जलावतरण आणि
5. उत्तर भारतात दाट धुके आणि थंडीची लाट

**पंतप्रधान**

72 व्या राष्ट्रीय व्हॉलीबॉल स्पर्धेचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दुरस्थ उपस्थितीत काल उत्तर प्रदेशातील वाराणसी इथं उद्घाटन झालं. राष्ट्र उभारणीत खेळाची भूमिका महत्वाची असल्याचं त्यांनी यावेळी बोलताना सांगितलं. व्हॉलीबॉल आणि भारताच्या विकासाच्या गाथा हे एकसारखेच आहेत. यामध्ये क्रिडापटू आणि देशाच्या विकासासाठी केलेलं काम हे एकत्रित सांघिक कार्यपध्दती, संतुलन आणि दृढनिश्चय या गुणांचा खेळ आणि देशाच्या प्रगतीमध्ये समान धागा असल्याचं ते म्हणाले. देशाच्या अर्थसंकल्पांत क्रिडाक्षेत्रासाठी भरीव तरतूद केल्यांचं पंतप्रधानांनी नमूद केलं. या स्पर्धा येत्या 11 तारखेपर्यंत चालणार आहेत, देशभरातील एक हजाराहून अधिक खेळाडूंचा सहभाग असलेले 58 संघ स्पर्धेत सहभागी होत आहेत.

**शिवराजसिंग चौहान**

भारतीय कृषी संशोधन परिषदेने विकसित केलेले 25 पिकांचे 184 नवीन सुधारित वाणांचं केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांच्या हस्ते काल नवी दिल्ली इथं उदघाटन झालं. यामध्ये 60 प्रकारच्या तांदुळाच्या जाती, 50 प्रकारची मका पिकं आणि 13 तेलबियांच्या जातींचा समावेश आहे. चीनला मागे टाकून भारत जगातील एक प्रमुख तांदूळ निर्यातदार देश बनला आहे. असं सिंह यांनी यावेळी सांगितलं. भारत आता परदेशी बाजारपेठांमध्ये तांदूळ पुरवत आहे.

भारताचे तांदूळ उत्पादन 150 दशलक्ष टन झालं आहे तर चीनचे उत्पादन 145 दशलक्ष टन इतकं आहे, असं सिंह म्हणाले. नव्याने लागू केलेला विकसित भारत जी-आरएएम-जी कायदा कामगारांच्या हिताचे रक्षण करतो. त्यांनी काँग्रेसवर विकसित भारत जी-राम-जी योजनेबाबत जनतेची दिशाभूल केल्याचा आरोप या कार्यक्रमापुर्वी नवी दिल्लीत एका पत्रकार परिषदेत बोलताना केलं.

**एस जयशंकर**

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर काल रात्री फ्रान्स आणि लक्झेंबर्ग दौऱ्यासाठी रवाना झाले. त्यांचा हा दौरा या महिन्याच्या 10 तारखेपर्यंत असेल. पॅरिसमध्ये, डॉ. जयशंकर फ्रांसमधील प्रमुख नेते तसंच परराष्ट्रमंत्री जीन नोएल बॅरो यांच्याशी चर्चा करतील. ते भारत-फ्रान्स धोरणात्मक भागीदारी अंतर्गत परस्पर हिताच्या तसंच जागतिक स्तरावरील महत्त्वाच्या मुद्यांवर चर्चा करतील. अशी माहिती परराष्ट्र मंत्रालयाने एका निवेदनाद्वारे दिली आहे. याबरोबरत डॉ जयशकर फ्रेंच राजदूतांसाठी असलेल्या परिषदेच्या 31व्या सत्रालाही संबोधित करतील. लक्झेंबर्गचे उपपंतप्रधान आणि परराष्ट्र व्यवहार मंत्री झेवियर बेटेल आणि इतर वरिष्ठ नेत्यांशी ते चर्चा करतील.

**आयुष**

भारताच्या पारंपरिक औषध प्रणाली आयुषला-ओमान आणि न्यूझीलंडसोबतच्या द्विपक्षीय व्यापार करारांमध्ये औपचारिक मान्यता मिळाली आहे. अशी माहिती वाणिज्य मंत्रालयाने दिली आहे. डिसेंबर 2025 मध्ये अंतिम झालेल्या या दोन्ही करारांमध्ये आरोग्य-संबंधित सेवा आणि पारंपरिक औषधांवर समर्पित परिशिष्टांचा समावेश आहे. आयुष आणि जैविक उत्पादनांच्या निर्यातीत 6 पुर्णांक 11 टक्के वाढ नोंदवली आहे, ही वाढ 2023-24 मधील 649 दशलक्ष अमेरिकन डॉलर्सवरून 2024-25 मध्ये 689 दशलक्ष डॉलर्सपर्यंत पोहोचली आहे. असंही मंत्रालयानं म्हटलं आहे.

**समुद्र प्रताप**

प्रदूषण रोखण्यास मदत करणा-या, स्वदेशी बनावटीच्या समुद्र प्रताप या युद्धनौकेचं जलावतरण संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या उपस्थितीत आज गोव्यात होणार आहे. 115 मीटर लांबीच्या या युद्धनौकेचा जवळ जवळ साठ टक्के भाग स्वदेशी उपकरणांपासून तयार करण्यात आला आहे. चार हजार दोनशे टन वजनाच्या या युद्धनौकेचा वेग 22 समुद्री मैल प्रति तास असून ती एका वेळी 6 हजार समुद्री मैलांचं अंतर पार करू शकते. नौदलाच्या ताफ्यात समुद्र प्रताप युद्धनौका समाविष्ट झाल्यामुळे भारतीय तटरक्षक दलाची क्षमता वाढणार असून सागरी सुरक्षा, पर्यावरण सरंक्षण आणि स्वदेशीच्या संकल्पनेला चालना मिळणार आहे.

**दिल्ली**

दिल्ली विधानसभेचे हिवाळी अधिवेशन आजपासून सुरू होत आहे. चार दिवसांचे हे अधिवेशन या महिन्याच्या 8 तारखेपर्यंत चालणार आहे. अधिवेशनादरम्यान प्रदूषण, पर्यावरण, तसेच शीश महल प्रकल्प आणि दिल्ली जल मंडळाशी संबंधित कॅगच्या अहवालासह विविध विषयांवर चर्चा अपेक्षित आहे.

**व्हेनेझुएला**

व्हेनेझुएलामधील सध्याच्या घडामोडींबाबत भारताने तीव्र चिंता व्यक्त केली आहे. परराष्ट्र मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनात भारताने व्हेनेझुएलाच्या लोकांच्या कल्याणासाठी आणि सुरक्षेसाठी आपला पाठिंबा असल्याचं पुन्हा एकदा अधोरेखित केलं आहे. सर्व संबंधितांनी संवादाद्वारे शांततापूर्ण मार्गाने समस्यांचे निराकरण करावे आणि व्हेनेझुएलाची शांतता सुनिश्चित करावी. असं आवाहन भारताकडून करण्यात आलं आहे.

दरम्यान, भारतीय नागरिकांना व्हेनेझुएलाचा अनावश्यक प्रवास टाळण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. व्हेनेझुएलामधील अमेरिकेच्या लष्करी कारवाईवर चर्चा करण्यासाठी संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषद आज तातडीची बैठक घेणार आहे. या घटनेवर चीनने टीका केली असून अमेरिकेने व्हेनेझुएलाचे पदच्युत राष्ट्राध्यक्ष निकोलस मादुरो आणि त्यांची पत्नी, सिलिया फ्लोरेस यांना तात्काळ मुक्त करण्याची मागणी केली आहे. तर इस्रायल आणि अर्जेंटिनाने या घडामोडींचे स्वागत केलं आहे.

व्हेनेझुएलाच्या सर्वोच्च न्यायालयाने उपराष्ट्रपती डेल्सी रॉड्रिग्ज यांना देशाच्या हंगामी राष्ट्राध्यक्षपदाची सुत्र स्वीकारण्याचे आदेश दिले आहेत. दरम्यान, व्हेनेझुएलावर लादलेल्या सध्याच्या 'तेल निर्बंधां'ची अंमलबजावणी करण्याव्यतिरिक्त अमेरिका व्हेनेझुएलाच्या प्रशासनात दैनंदिन भूमिका बजावणार नाही. असं अमेरिकेचे परराष्ट्र सचिव मार्को रुबियो यांनी काल स्पष्ट केलं. अमेरिका व्हेनेझुएलाचा कारभार चालवेल. अशी घोषणा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी एक दिवस आधी घोषणा केली होती. त्यांनंकर रूबिओ यांनी एका दुरचित्रवाणी वाहिनीशी संवाद साधताना हे वक्तव्य केलं आहे.

दरम्यान, वाढता भू-राजकीय तणाव आणि व्हेनेझुएला उद्भवलेल्या अनिश्चिततेमुळे, ओपेक या तेल उत्पादक देशांच्या संटनेने तेलाचे उत्पादन स्थिर ठेवण्यास तत्त्वतः सहमती दर्शवली आहे. सौदी अरेबिया, रशिया, संयुक्त अरब अमिराती, कझाकस्तान, कुवेत, इराक, अल्जेरिया आणि ओमान, एकत्रितपणे जगाभरातील मागणीच्या एकंदर अर्ध्या प्रमाणात तेलाचे उत्पादन करतात.

**इराण**

इराणमध्ये सुरु असलेल्या सरकारविरोधी निदर्शनं, देशांतर्गत वस्तूंच्या वाढत्या किमती आणि कमकुवत होत असलेल्या रियाल या चलनाची घसरती किंमत या पार्श्वभूमीवर महागाईचा परिणाम कमी करण्यासाठी इराणने सरकारी अनुदानात मोठी वाढ काल जाहीर केली आहे. सध्याच्या रकमेच्या तिप्पटाहून अधिक मासिक अनुदान दिलं जाईल. प्रति कुटुंब तीन दशलक्ष रियालवरून दहा दशलक्ष रियालपर्यंत अनुदान वाढवलं जाईल. असं इराणच्या सरकारी प्रवक्त्या फातिमा मोहजेरानी यांनी म्हटलं आहे. राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेशकियान यांनी जारी केलेल्या आदेशानुसार, हा कार्यक्रम जानेवारीच्या दुसऱ्या आठवड्यात सुरू होईल. इराणच्या 31 पैकी किमान 17 प्रांतांमध्ये आंदोलनाने जोर पकडला असून या संबंधित हिंसाचारात किमान 16 लोकांचा मृत्यू झाला आहे.

**साहित्य संमेलन**

मराठी केवळ संवादाची भाषा न राहता ती रोजगाराची भाषा झाली पाहिजे. तिचं व्यावसायीक महत्व टिकवून ठेवत मराठीचं वैभव कायम ठेवणं हे केवळ आपलं कर्तव्य नसून ती आपली सर्वांची जबाबदारी आहे असं प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलं. सातारा इथं भरवण्यात आलेल्या नव्याण्णव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या समारोप समारंभात ते काल बोलत होते. ज्ञानपीठ पुरस्कार सन्मानीत ज्येष्ठ साहित्यीक रघुवीर चौधरी या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

**मुष्टीयुध्द**

ग्रेटर नोएडा इथं गौतम बुद्ध विद्यापीठात सुरू असलेल्या एलिट पुरुष आणि महिला राष्ट्रीय मुष्टायुध्द अजिंक्यपद स्पर्धेत, काल अमित पांघल आणि हरियाणाच्या सागरने वेगवेगळ्या शैलीत विजय मिळवून पुढील फेरीत प्रवेश केला आहे.

**बीचगेम्स**

दुसऱ्या खेलो इंडिया किनारी स्पर्धा आजपासून दीवच्या घोगला किनाऱ्यावर सुरू होत आहेत. या स्पर्धेत 2 हजारांपेक्षा जास्त क्रीडापटू विविध आठ क्रीडा प्रकारांमध्ये सहभाग घेत आहेत. भारतीय क्रीडा प्राधिकरण आणि राष्ट्रीय क्रीडा संघटनेच्या सहकार्यानं होत असलेली ही स्पर्धा येत्या 10 जानेवारीपर्यंत सुरू राहणार आहे. समुद्र किनाऱ्यावरील फुटबॉल, व्हॉलीबॉल, कबड्डी, आणि ओपन वॉटर स्विमिंग या सारख्या विविध प्रकारत या स्पर्धा होणार आहेत.

**हवामान**

दिल्ली, हरियाणा, चंदिगड, ओडीशा, पंजाब, उत्तरप्रदेशचा पुर्व भाग आणि मध्य प्रदेशमध्ये आज आणि उद्या दाट धुक्याची चादर राहिल. यामुळे दृष्यमानता कमी झाली असून रेल्वेसेवा विस्कळीत झाली आहे. 11 रेल्वेगाड्या उशीराने धावत आहेत. इंदूरमध्ये नर्सरी ते आठवीपर्यंतच्या शाळा तीन दिवस बंद राहणार आहेत. झारखंडमध्ये सध्या थंडीची लाट आहे. यामुळे रांची आणि जमशेदपूरमधील शाळा उद्यापर्यंत बंद राहतील. भारतीय हवामान विभागाने झारंखंडमधील काही भागांत तीव्र थंडीची लाट येण्याचा इशारा दिला आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं

# नमस्कार